# नोटाबंदी करनेवालो, ''हिसाब दो - जवाब दो''

कॉ. डॉ. भालचंद्र कानगो

८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी अत्यंत नाट्यमय पद्धतीने घोषणा करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५०० व १००० रुपयांच्या नोटा चलनातून बाद केल्याची घोषणा केली. काळा पैसा बाहेर काढण्यासाठी, दहशतवाद्यांचा पुरवठा तोडण्यासाठी व खोट्या नोटांचा प्रश्न सोडवण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सांगून त्याचे जोरदार समर्थन केले.

सर्वसामान्य माणसाला काळा पैसा व पैसेवाले यांच्या विरुद्ध राग आहे व तो योग्यच आहे, या भावनेला हात घालून व त्याला देशभक्तीची जोड देऊन पंतप्रधानांनी लोकांना त्यांचा खरा पैसा घेऊन (काळा नव्हे!) रांगेत उभे केले व पैसे बँकेत ठेवण्यास भाग पाडले. पैसे काढल्यावर बंधने आणली. २००० रुपयाची नवीन नोट आणून काळा पैसा पांढरा करण्यासाठी मदतही केली. कमी पैसा मिळत आहे व बाजारात सुट्टे पैसे नसल्यामुळे नवीन २००० रुपयाची नोट उपयोगाची नाही. त्यामुळे लोकांचा त्रास वाढला. १०० लोक रांगेत उभे असताना धसक्याने मरण पावले. अनेकांची लग्ने लांबली, औषध उपचार घेणे अवघड झाले, रोजचा व्यवहार थंडावला. रस्त्यावरील चहावाले, रिक्षाचालक, टॅक्सी चालक, भाजीवाले, फेरीवाले व रोजंदारीवर काम करणारे लाखो कामगार त्रस्त झाले. नुकसान सहन करू लागले. अनेक कारखाने उत्पादन कमी झाल्यामुळे कामगार कपात करू लागले. अर्धपगारी रजा घेऊन कायम कामगारांना घरी राहावे लागले.

रिझर्व बँक व सरकार यांनी दररोज नवीन घोषणा व नियम जाहीर करण्याचा सपाटा लावून नवीन विक्रमच केला. परंतु बँकांत पुरेसे नवीन चलन वेळेवर न आल्यामुळे, बँकांसमोरील रांगा बघून बँक मॅनेजर स्वत:च पैसे देणेसंबधी निर्णय घेऊ लागले व लोकांच्या शिव्याही खाऊ लागले. अर्थव्यवस्थेत चलनातील ७०% पैसा आटल्यामुळे मंदी आली. सरकार मात्र ५० दिवस त्रास सहन करा असे सांगू लागले. देशभक्त भारतीय त्यावर विश्वास ठेवून जगत आहेत. अनुभव मात्र वेगळाच येत आहे व हा त्रास काही महिने चालेल असे आता स्पष्ट होत आहे.

बँकांत जमा झालेल्या ५०० व १००० रु. च्या नोटा व प्रत्यक्षात बाजारात असलेल्या नोटा यांचा फरक अत्यंत कमी असल्याचे वास्तव समोर येत आहे. १४ डिसेंबरपर्यंत सर्व बँकांत १३ लाख १० हजार कोटी रुपयांच्या नोटा जमा झाल्या आहेत. बाजारात १४ लाख ८६ हजार कोटी रुपयांच्या नोटा होत्या. ३० डिसेंबरपर्यंत आणखी नोटा बँकेत जमा होणार म्हणजे अत्यंत अल्प काळा पैसा बाहेर पडणार. डोंगर पोखरून उंदीर काढला असेच नोटाबंदीच्या निर्णयाचे वर्णन करावे लागेल. अपेक्षित काळा पैसा बाहेर निघत नाही असे आता नरेंद्र मोदी व त्यांचे भाट यांच्या लक्षात आले आहे; त्यांना ते माहितीच होते; त्यामुळे त्यांनी आता त्यांचा खरा हेतू म्हणजे कॅशलेस व्हा असे सांगण्यास सुरुवात केली आहे. लोकांनी कॅशलेस व्हावे म्हणून जबरदस्तीने लोकांचे पैसे बँकेत ठेवून, चलन तुटवडा निर्माण करून कॅशलेस व्यवहार करणाऱ्या कंपन्यांना मालामाल करण्यासाठी सर्व खटाटोप चालू आहे. सर्वसामान्य शहरी मध्यमवर्गीय, डेबीट कार्ड, क्रेडिट कार्ड, मोबाईल बँकींग, नेट बँकींग यालाच आधुनिकता व विकास समजत असल्यामुळे त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी हे खरेच काळा पैसा बाहेर काढीत आहेत व 'सबका साथ सबका विकास करून आणीत आहेत असा आभास निर्माण झाला आहे. खरे पाहता 'सबका पैसा कॉर्पोरेट फायदा' हा व्यवहार होत आहे. रांगेत उभे राहून त्रस्त झालेल्या लोकांच्या हे लक्षात येऊ लागले आहे.

नवीन आर्थिक धोरण म्हणजे शेतकरी व ग्रामीण भारतावर मोठा हल्लाच आहे हेच काम आता नोटाबंदीच्या निमित्ताने समोर आले आहे. ग्रामीण भागाची गरज पुरवणाऱ्या सहकारी बँकांचे व्यवहार बंद केले आहेत. शेतीमालाचे भाव कोसळले आहेत. भाजीपाला कवडीमोल भावाने विकावा लागत आहे. सरकारचा शहरी कॉर्पोरेट चेहरा उघडा पडला आहे. काळा पैसा पांढरा करण्यासाठी मदत करणाऱ्या खाजगी बँकांना सरकारी बँकांपेक्षाही जास्त पैसा दिल्याचा आरोप बँक कर्मचारी नेते करीत आहेत.

असंघटित भारतीय अर्थव्यवस्था व ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला कॉर्पोरेट जगाच्या फायद्यासाठी कॅशलेस म्हणून, आधुनिक करण्यासाठी ही भारतीय जनतेची लूट नोटाबंदीच्या निर्णयामुळे होत आहे. या प्रक्रियेत लोकांना झालेल्या व होत असलेल्या त्रासाच्या नुकसानीच्या कहाण्या आता सर्वदूर पसरल्या आहेत.

शेतकऱ्यांना, अंगणवाडी, आशा कर्मचारी, शालेय पोषण कर्मचारी, बांधकाम कामगार, घरकामगार यांसारख्या जनविभागांना पेन्शन मिळावे, सामाजिक सुरक्षा मिळावी, मोफत शिक्षण मिळावे व परवडणारी आरोग्य सेवा मिळावी म्हणून ''हिसाब दो जवाब दो'' आंदोलन करण्याचा निर्णय भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राष्ट्रीय कौन्सिलने आपल्या हैद्राबाद येथील झालेल्या बैठकीत घेतला आहे. हे आंदोलन सर्व देशभर जानेवारी महिन्यात करावे अशी हाक दिली आहे. महाराष्ट्रात हे आंदोलन जानेवारी १२ रोजी विदर्भातील सर्व जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनी प्रचार करून नागपूर येथील रिझर्व बँकेसमोर दुपारी १२.०० वाजता धरणे व निर्देशन करून करावे. तसेच उर्वरित महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी नवी मुंबई, कोकण भवन जवळील रिझर्व बँक समोर त्याच दिवशी १.०० वाजता आंदोलन करून काळ्या पैशाचा हिशोब मागावा व जवाब मागावा असे आवाहन राज्याचा सचिव म्हणून मी कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कौन्सिलतर्फे करत आहे.

❑